स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Synopsis of the Thesis Entitled

: शिर्षक :

“डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विद्याशाखेतील

राज्यशास्त्र विषयात पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाचा

शोधप्रबंधाचा गोषवारा

: संशोधक :

कांबळे प्रज्ञा ज्ञानोबा

(नेट, सेट)

: मार्गदर्शक :

डॉ.धुमाळे डी.के.

(एम.फील. , पीएच.डी.)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ

जुलै २०२१

प्रस्तावना

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल माक्स्र यांच्या समाजवादी विचारांचे तूलनात्मक अध्ययन' या विषयाला अनुसरुन समाजवादाचे अध्ययन केले जाणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स या राजकिय विचारवंतांचे राज्यशास्त्रामध्ये वैचारिक महत्त्व अनन्य साधारण आहे. सामाजिक शास्त्रामध्ये विशेषतः राज्यशास्त्रामध्ये यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे असल्याचे आपणास दिसून येते. या शोधनिबंधात 'समाजवाद' या घटकाचे अध्ययन केले जाणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांचा जीवन परिचय व त्यांनी मांडलेले समाजवादी विचार याचे अध्ययन संशोधकाकडून केले जाणार आहे. कार्ल मार्क्स व बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचारांची तूलना केली जाणार आहे.

समाजवाद ही राजकिय संकल्पना अतिशय महत्त्वपूर्ण आहे. राज्यशास्त्रामध्ये अनेक राजकिय संकल्पना आहेत. या राजकिय संकल्पनेचा अभ्यास एक राजकिय विचार प्रणाली म्हणून केला जातो. समाजवाद म्हणजे काय? तर राज्यातील सर्व साधन संपत्ती ही संपूर्ण समाजाच्या मालकीची असणे. समाजवादामध्ये कोणतेही एक व्यक्ती मालक असत नाही. भारतामध्ये ब्रिटिश राज्याला विरोध करण्यासाठी भारतीय समाजवादाची सुरुवात झाली. रशियन क्रांतीनंतर भारतामध्ये समाजवादाचा विकास सुरु झाला. भारतीय कम्यूनिस्ट पार्टी ची स्थापना 1921 मध्ये झाली म्हणजे भारताने विचारधारा म्हणून समाजवादाची सुरुवात होत होती. भारतीय समाजवादामध्ये गांधीवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो. भारतामध्ये महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय इ. विचारवंतांनी समाजवादी चिार मांडलेले आहेत. भारतीय समाजवाद हा पाश्चिमात्य समाजवादापेक्षा वेगळा असलेला आपणास दिसून येतो.

समाजवाद ही एक आर्थिक-सामाजिक विचारधारा आहे. समाजवादी व्यवस्थेमध्ये धन-संपत्तीचा मालकी आणि वितरण समाजाच्या अधीन असते. समाजवादामध्ये वैयक्तिक संपत्तीला विरोध केला जातो. संपत्ती उत्पादन आणि वितरण समाजाच्या हातात असते. समाजवाद हा भांडवलशाहीच्या विरोधात असतो. भारतीय समाजवाद हा एक वेगळा समाजवाद आहे. यामध्ये राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण, नरेंद्र देव यांची राजकिय चिंतनातून निर्माण झालेला गांधीवादी समाजवाद म्हणजे भारतीय समाजवाद होय.

समाजवाद हा शब्द 'सोशालिजम' या या इंग्रजी शब्दाचे भाषांतरित रुप आहे. 19 व्या शतकाच्या पूवार्धात हा शब्द प्रयोग करण्यात आला याचा अर्थ व्यक्तीवादाच्या विरोधात सामाजिक

जिवन बदलण्याच्या अर्थाने केला जात होता. समाजवादाची व्याख्या करणे कठिण आहे परंतू आपण समाजवादाचा अर्थ समजून घेत असताना सर्व साधन सपंत्ती ही समाजाच्या मालकिची असणे म्हणजे समाजवाद होय असा समाजवादाचा अर्थ सांगू शकतो.

कार्ल मार्क्स यांना शास्त्रीय किंवा वैज्ञानिक समाजवादाचे जनक समजले जाते. कार्ल मार्क्स यांच्या शास्त्रीय समाजवादी विचार हे सामाजिक आणि राजकीय अदलाबदलीच्या पार्श्वभूमीतून निर्माण होतात. कार्ल मार्क्स यांनी एंजेल, ओवेत यांच्या प्रेरणेतून समाजवादी विचार घेतले. परंतू त्यांनी एंजेल या समाजवादाला काल्पनिक समाजवाद असे सांगून स्वतः शास्त्रीय समाजवादाची मांडणी केली. कार्ल मार्क्स यांच्या मते समाजवादाचे कोणतेही रुप ऐतिहासिक प्रक्रियेतून निर्माण होत असते. त्यांच्यासाठी समाजवाद मुख्यतः भांडवलशाहीला विरोध करण्यासाठी सामाजिक क्रांतीचा उपयोग घेत असतो. समाजवादी विषयासंदर्भात कार्ल मार्क्स यांनी महत्त्वपूर्ण रचना म्हणजे 'क्रिटिक ऑफ द गोथा प्रोग्रॅम' होय. यामध्ये त्यांनी समाजवादासंदर्भात विचार स्पष्ट केले आहेत. कार्ल मार्क्स यांनी शास्त्रीय समाजवाद, ऐतिहासिक, भौतिकवाद, साम्यवाद इत्यादि राजकिय विचारांची मांडणी केली आहे. जगामध्ये सर्व प्रथम शास्त्रीय समावदाची मांडणी कार्ल मार्क्स यांनी केली आहे. जगामध्ये पहिल्यांदा कामगारांचा विचार करुन कामगारांचे कल्याण व्हावे यासाठी प्रयत्न करणारा विचारवंत म्हणजे कार्ल मार्क्स होय. परंपरेने चालू असलेल्या भांडवलशाहीला विरोध करुन सर्व संपन्नता, उत्पादनाची सर्व साधने हा कामगारांचा म्हणजे समाजाचा हाती असणे, संपत्तीचे समान वाटप होणे, भांडवलदार वर्गापासून कामगारांचे होणारे शोषण थांबले जावे, कामगारांवर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी कार्ल मार्क्स यांनी प्रयतन केले. जगामध्ये सर्व कामगारांना एकत्र करुन साम्यवादी क्रांती घडवून आणण्याचे श्रेय कार्ल मार्क्स यांच्या विचारांना व कार्याला जातो. त्यांनी आपले आयुष्य कामगार कल्याणासाठी खर्च केले. तेथून खरा शास्त्रीय समाजवाद आपणास दिसून येतो. या समाजवादाची सुरुवात करण्याऱ्या कार्ल मार्क्स यांचे समाजवादी विचारांचे अध्ययन केले जाणार आहे.

कार्ल मार्क्स यांचा समाजवादी विचाराबरोबर आपल्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजवादी विचारांचे अध्ययन करायचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासात एक महामानव म्हणून त्यांची ओळख आहे. ते एक आर्थिक, राजकिय विचारवंत होते, त्यांना समाज सूधारक म्हणून प्रसिध्द मिळवलेली आहे. भारतीय राजकिय विचारवंताचा अभ्यास करत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राजकिय विचारवंत महत्त्वपूर्ण ठरतात. त्यांनी राजकिय विचारवंत म्हणून आंबेडकरांचे राज्यासंबंधी विचार, लोकशाही संबंधी विचार, आर्थिक विचार, याबरोबर समाजवादी विचार अशा अनेक बाजूनी विविध विचार मांडलेले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या

विचारप्रणाली द्वारे भारताला वाटचाल करण्यासाठी ज्याप्रमाणे दिशा दाखवून दिली त्याप्रमाणे जगाला शांततेचा मार्ग त्यांनी दाखवला, भारतीय समाजाला, दलित वर्गाला, एक वेगळी दिशा दिली. भारतीय समाज रचनेत बदल घडवून आणला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक सूधारणा घडवुन आणल्या त्याप्रमाणे राजकिय प्रक्रियेत भाग घेतला. भारताचे प्रथम कायदेमंत्री, कामगार मंत्री म्हणून त्यांनी कार्य केले. कामगार मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी कामगारांसाठी केलेल्या मागण्या, कामगार कायदे, कामगार कल्याणासाठी केलेले प्रयत्न यामधून आपणास आंबेडकर हे एक समाजवादी विचारवंत होते असू सांगता येते. त्यांनी समाजवादी विचारांची मांडणी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा समाजवादा मध्ये जमिनीवर सामुहिक शेती करणे, मोठे उद्योग सरकारकडून चालवले जावेत, कोणतेही व्यक्ती, जमिन, उद्योग, विमा यांची मालकी हक्क ठेवणार नाही. राज्य समाजवाद हा बुध्द धर्मापासून प्रेरित होता, भिक्कू जवळ ज्याप्रमाणे संपत्ती नसते त्याप्रमाणे सर्व काही समाजाचे असावे, वैयक्तिक मालकी असू नये. परंतू व्यक्ती जवळ मर्यादित संपत्ती असावी अशा समाजवादी विचारांची मांडणी आंबेडकरांनी केलेली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन या शोधनिबंधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांचा जिवन परिचय तसेच त्यांनी मांडलेले समाजवादी संबंधी विचार याचा सखोल अध्ययन संशोधकाकडून केले जाणार आहे. यामध्ये समाजवाद या राजकिय संकल्पनेचा उदय कसा झाला, समाजवाद म्हणजे काय? समाजवादाचे महत्त्व, समाजवाद या राजकिय विचारप्रणालीचा जगाने स्विकार केला की नाही? या प्रश्नांची उत्तरे आपणास संशोधकाकडून या शोधनिबंधात दिली जाणार आहेत. त्याचबरोबर आंबेडकरांनी सांगितलेला समाजवाद अर्थ?, आंबेडकरांचा समाजवादाचा उपयोग जगाला कोणत्य प्रकारे झाला तसेच कार्ल मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवादाचे महत्त्व, जगाला काय उपयोग झाला, सध्यकालीन उपयुक्तता अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपणास या शोधनिबंधात सविस्तरपणे मिळणार आहेत आणि वाचकाचे समाधान व्हावे हा संशोधनाचा हेतू राहणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांची तूलना करण्याचा संशोधकाचा मानस आहे. या दोन राजकिय विचारवंताच्या समाजवादा संबंधी विचारांची तुलना केली जाणार आहे. म्हणजेच शोधनिबंधाच्या शिर्षकाप्रमाणे शोधनिबंध पूर्ण केल्याचे समाधान संशोधकाला व वाचकास मिळावे असा संशोधनाचा हेतू आहे.

अशा प्रकारे या शोधनिबंधात संशोधकाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स या दोन महान राजकिय विचारवंताच्या राज्यशास्त्रातील महत्त्वाच्या राजकिय विचारप्रणालीचा म्हणजे ‘समाजवाद’ या संकल्पनेचे तूलनात्मक अध्ययन करुन संशोधकाला आढळून आलेल्या निष्कर्षाची

मांडणी या शोधनिबंधाच्या शेवटी केली जाणार आहे. निश्चितच वाचकांचे समाधान होईल असा शोधनिबंध सादर करण्याचा संशोधकाचा मानस आहे.

विषय निवडी भूमिका :-

संशोधनाचा विषय निवडताना अध्ययनाचे काही पैलू निश्चित केले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी संकल्पनेचा सखोल अभ्यास करणे, त्यांच्या विचारांची तुलना करणे हा या शोधनिबंधचा मुख्य हेतू आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स या दोन्ही राजकिय विचारवंताचे राज्यशास्त्रातील महत्त्व लक्षात घेवून या विषयाची निवड संशोधककाकडून करण्यात आली आहे आणि 'समाजवाद' या विषयाची निवड करण्यामागची भूमिका अशी आहे सद्य परिस्थितीमध्ये समाजवादाचे महत्त्व स्पष्ट करणे.

वरील पैलू बरोबर संशोधकाची या विषयातील आवड असणे ही सुध्दा विषय निवडीची भूमिका आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

राज्यशास्त्रातील अनेक राजकिय संकल्पनेपैकी 'समाजवाद' ही अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. या समाजवादाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या दृष्टिकोणातून अध्ययन करण्यासाठी यांची तूलना करुन सद्य परिस्थितीत समाजवादाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी या संशोधन विषयाचे महत्त्व असल्याचे आपणास सांगता येते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of Research):-

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांचे तूलनात्मक अध्ययन' या विषयाचे अध्ययन हे सर्वव्यापी व सर्वस्पर्शी होवुन संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त करुन देण्यासाठी संशोधनाची खालील उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली आहेत.

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवन परिचय व त्यांच्यावरील प्रभाव प्रथम स्पष्ट करणे व इतर अभ्यासकांना, संशोधकांना तसेच विद्यार्थ्यांना पूरक ठरेल अशी माहिती संकलीत करणे.
2) कार्ल मार्क्स यांचा जीवन परिचय व त्याच्यावरील प्रभाव स्पष्ट करणे व वाचकांना पूरक व मार्गदर्शक ठरेल अशी माहिती एकत्रित करणे.
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचाराचा आढावा घेणे.
4) कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचार जाणून घेणे.

5) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांची समानता जाणून घेणे.

6) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांतील भेद जाणून घेणे.

7) एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादाचे तटस्थपणे तूलना करणे.

संशोधनाचे गृहितके (Research Hypothesis):-

1) राजकीय विचारसरणीत समाजवाद ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे.

2) कार्ल मार्क्स यांच्या जीवन परिचयापासून त्यांच्या राजकीय विचारांची प्रभावशीलता दिसून येते.

3) डॉ.आंबेडकर यांच्या जीवन परिचयातून विचारांची जागतिक, राजकीय विचारात प्रभावशीलता दिसून येते.

4) कार्ल मार्क्स आणि डॉ.आंबेडकर यांच्या समाजवादी विचारातून समानता दिसून येते.

5) कार्ल मार्क्स आणि डॉ.आंबेडकर यांच्या समाजवादी विचारात भिन्नता दिसून येते.

6) सद्यकालीन राजकीय विचारात कार्ल मार्क्स व डॉ.आंबेडकर यांच्या समाजवादी विचारांची उपयुक्तता दिसून येते.

संशोधनाचे मर्यादा क्षेत्र (Limitation of Research):-

प्रस्तूत संशोधनाचे मर्यादा क्षेत्र हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन करणे एवढेच मयादित आहे. या प्रबंधाची मांडणी करत असताना समाजवाद या संकल्पनेचा अभ्यास केला जाणार असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादाची तुलना करणे हा संशोधनाचा गाभा असणार आहे. त्यामुळे तुलनात्मक अध्ययनावर जास्त भर दिला जाणार आहे. संशोधनाचा विश्लेषणात्मक पध्दत स्विकारुन तुलनात्मक अध्ययन केले जाणार आहे.

संशोधनाचा आराखडा (Research Methodology) :

प्रस्तुत संशोधनाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांचे तुलनात्मक अध्ययन केले जाणार असुन ते एकुण सात प्रकरणात केले जाणार आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला जाणार आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना

या शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये समाजवाद या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट केला जाणार आहे. कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य, समाजवादा संबंधी थोडक्याच विचार मांडले जाणार आहेत. शोधनिबंधाची थोडक्यात माहिती, विषय निवडीची भूमिका, गृहितके, संशोधनाची उद्दिष्ट्ये, मर्यादा क्षेत्र या घटकांची माहिती आपल्याला पहिल्या प्रकरणात दिली जाणार आहे.

प्रकरण दुसरे

कार्ल मार्क्स यांचे जीवन व कार्य

शोधनिबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये कार्ल मार्क्स यांचा जीवन परिचय अभ्यासला जाणार आहे. कार्ल मार्क्स यांचा जन्म, शिक्षण, कुटूंब पध्दती, प्रभाव इत्यादी घटकांचा व समाजवादी विचारांचे अध्ययन या प्रकरणात केले जाणार आहे.

प्रकरण तिसरे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य

शोधनिबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची कौटुंबिक जीवन, शैक्षणिक जीवन, त्यांच्या कर्याचा अनुभव, शिक्षण पध्दती, वैचारिक प्रभाव, एकंदरित त्यांच्या संपूर्ण जीवन कार्याचा आढावा या प्रकरणामध्ये घेतला जाणार आहे.

प्रकरण चवथे

कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचारातील साम्य

या शोधनिबंधाच्या चवथ्या प्रकरणामध्ये कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचारातील साम्य याचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण पाचवे

कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचारातील भिन्नता

या शोधनिबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचारातील भिन्नता याचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण सहावे

सद्यकालीन राजकिय विचारात कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची समाजवादाची उपयुक्तता

या शोधनिबंधाच्या सहाव्या प्रकरणामध्ये कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचारांची काय उपयुक्तता आहे याचे अध्ययन या प्रकरणात केले जाणार आहे.

प्रकरण सातवे

निष्कर्ष

या शोधनिबंधाच्या सातव्या प्रकरणामध्ये कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजवादी विचारांचे निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची :-

1) डॉ.डी.आर.जाधव –डॉ.बी.आर.आंबेडकर का नैतीक दर्शन, शकुंतला जातक प्रकाशन, राजस्थान 1996

2) राहूल सांकृत्यायन – कार्ल मार्क्स- किताब महल अलाहाबाद 1667

3) सूमन दाभोळकर-समाजवाद- सुगाव प्रकाशन पूर्व, 1990

4) धनराज द.- डॉ.आंबेडकरांचे समाजवादी चिंतन-संकेत प्रकाशन, नागपूर 1999

5) खैरमोडे चांगदेव – डॉ.भिमराव रामजी आंबेडकर- सूगावा प्रकाशन, पुणे 1989

6) प्र.क्ष.गायकवाड- डॉ.बी.आर.आंबेडकरांचे जीवन व संघर्ष,परिमल प्रकाशन,औरंगाबाद 1996

7) धनंजय की.र.- डॉ.बाबासाहेब आंबेडकर- पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 1982

8) शंकरराव खरात- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा- इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पूणे 1987

9) सौ.शारदा जोशी-डॉ.बाबासाहेब आंबेडकर सविस्तर चरित्र व विचारधन- विद्याभारती प्रकाशन, लातूर

संशोधक

कांबळे प्रज्ञा ज्ञानोबा

(नेट, सेट)

मार्गदर्शक

डॉ.धुमाळे डी.के.

(एम.फील., पीएच.डी.)